मुंबई, दि.: / .०९.२०१७

क्र.: पोमसं/२८-अ/४९३७/मपोकनिस बैठक-पु.अनुदान/४३९/०५,

**विषय :-** मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीची दि. २५/०७/२०१७ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी होणेबाबत.

* * * * *

**परिपत्रक :-**

मध्यवर्ती पोलीस कल्याण निधी समितीची बैठक मा. पोलीस महासंचालक यांचे अध्यक्षतेखाली, मंगळवार दि. २५.७.२०१७ रोजी सकाळी ११.३० वा. संपन्न झाली आहे. सदर बैठकीत या कार्यासनाने पुस्तक अनुदानाच्या अनुषंगाने ज्याप्रमाणे गुण वाढविण्यात आले, त्याप्रमाणे पुस्तक अनुदानामध्ये वाढ होण्याबाबत मुद्दा उपस्थित केलेला होता. सदर मुद्याचे अनुषंगाने पोलीस अधिकारी/कर्मचारी यांच्या मुलां-मुलींच्या पुस्तक अनुदानात २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून खालीलप्रमाणे सरासरी २५% प्रमाणे वाढ करण्याचा सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला आहे :-

| अभ्यासक्रम | गुण /श्रेणी | अनुदान रु. | नवीन देय असलेले २५% प्रमाणे वाढीव अनुदान |
|---|---|---|---|
| ५वी ते १०वी | ८५% किंवा किमान ३ विषयांत अ-२ किंवा त्यावरील श्रेणी | १,०००/- | १२५०/- |
| ११वी / १२वी | ८०% | २,०००/- | २५००/- |
| वरिष्ठ महाविद्यालय /पोस्ट ग्रॅज्युएट/बी.ए/बी.कॉम,एम.ए, बीएससी.,एम कॉम, हॉटेल मॅनेजमेंट इ. | ७०% | ३,०००/- | ३७५०/- |
| अभियांत्रिकी पदविका (डिप्लोमा) | ६५% | ३,०००/- | ३७५०/- |
| वैद्यकीय पदवीका / डी.फार्मसी | ६५% | ३,०००/- | ३७५०/- |
| अभियांत्रिकी पदवी/पदव्युत्तर पदवी BE/ME | ६५% | ७,०००/- | ८७५०/- |
| वैद्यकीय /पशुवैद्यकीय पदवी/पदव्युत्तर पदवी / B pharm / M pharm | ६५% | १५,०००/ | १८७५०/- |

२. तरी सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, पोलीस कल्याण निधी नियमावली, नियम क्र.९(१)(ब) मधील परिच्छेद २ मध्ये वरीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत असून, त्यानुसार २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून वाढीव पुस्तक अनुदान वितरीत करुन, त्यावर झालेल्या एकूण खर्चाची माहिती, या कार्यालयास कृपया तात्काळ सादर करावी.

(अनुप कुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके/रा.रा.पो.बल/वाहतूक/ना.ह.सं./दहशत विरोधी पथक / लोहमार्ग, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश विभाग, म.रा., पुणे.

पोलीस अधीक्षक कार्यालय उस्मानाबाद
पो.अ.
अपर पो.अ.
उप अ.(मु.)
का.अ.
प्र.लि.

2162D:\User\Desktop\Desk 28-A\desk 28-a.doc

Scanned by CamScanner

तातडीचे

क्र.प्रोमसं/२८-अं ४९३७/उच्चशिक्षण-प्रो.यो/१३९/२०१६, मुंबई, दि.१९/०९/२०१६

विषय :- पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन योजना.

********

पोलीस अधिकारी तसेच कर्मचा-यांना (पोलीस शिपाई पासून ते पोलीस निरीक्षक पर्यंत) तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना त्याच्या पाल्यांना इच्छेप्रमाणे उच्च शिक्षण देण्याकरिता वित्तीय समस्येसह इतरही ब-याच अडचणींना सामोरे जावे लागते, कधी कधी उच्च गुणवत्ता प्राप्त करुनही आर्थिक कमतरतेमुळे मुलांना उच्च शिक्षणापासून / नामांकित शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यापासून वंचित रहावे लागते. पोलीस अधिकारी/ कर्मचा-यांची व सभासद लिपीकवर्गीय अधिकारी / कर्मचा-यांची पाल्ये उच्च शिक्षण घेऊन, त्याप्रमाणे व्यावसायिक दृष्टीकोनातून सबळ बनून त्यांना चांगला रोजगार मिळाला पाहिजे, जेणेकरुन त्यांना त्यांच्या भविष्याची सतत काळजी वाटणार नाही. या दृष्टीकोनातून पोलीस अधिकारी / कर्मचारी, तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी / कर्मचा-यांच्या गुणवत्ता प्राप्त गरजू पाल्यांना त्यांच्या उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक फी भरण्याकरिता पोलीस कल्याण निधीतून आर्थिक मदत देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे.

(२) या योजने अंतर्गत पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी खालील प्रमाणे दोन प्रकारे आर्थिक मदत देण्यात येईल :-

अ) खालील नमूद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस एकावेळी रु. २५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम अनुदान / स्कॉलरशिप म्हणुन देण्यात येईल.

१) भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT)
२) महाराष्ट्रातील किंवा देशांतर्गत कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय जेथे अखिल भारतीय स्तरावर किंवा महाराष्ट्र राज्याच्या सी.ई.टी. मार्फत प्रवेश देण्यात येतो.
३) भारतीय प्रबंध संस्था (IIM)
४) सर्व नॅशनल लॉ स्कूल्स
५) सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था ( NIT)

पोलीस अधिक्षक कार्यालय उस्मानाबाद
शाखा CB-3
आवक क्र 4523
22 SEP 2016



Scanned by CamScanner

ड) डेंटल कॉलेज, जेथे अखिल भारतीय स्तरावर किंवा महाराष्ट्र राज्याच्या सी.ई.टी मार्फत प्रवेश देण्यात येतो.

ब) वरील शिक्षण संस्थांसह बी.टेक / बी.ए.एम.एस. / बी.एच.एम.एस./ इतर मॅनेजमेंट कॉलेज, बी.सी.ए / एम.सी.ए. अशा प्रकारचे, व त्या समकक्ष इतर महत्वाचे शिक्षण घेत असलेल्या शासनमान्य अभियांत्रिकी / वैद्यकीय तसेच प्रबंध संस्थामध्ये आणि इतर शासनमान्य व्यावसाईक अभ्यासक्रमासाठी पाल्यांच्या शिक्षणासाठी अधिकारी / कर्मचा-यांना कर्ज स्वरुपात शिक्षणासाठी वार्षिक टयुशन फी स्वरुपात भराव्या लागणा-या फी एवढी रक्कम, रु. ५०,०००/- ( रुपये पन्नास हजार) च्या वार्षिक कमाल मर्यादेत, १२ मासिक हप्त्यांमध्ये परतफेड करण्याच्या अटीवर देण्यात येईल. कर्जस्वरुपात घेतलेल्या रकमेची परतफेड केल्यानंतर संबंधीत पाल्याने त्या कोर्समध्ये गुणवत्ता प्राप्त केल्यास (शैक्षणिक सत्रात ६०% पेक्षा जास्त गुण मिळविल्यास व पाल्यांना आवश्यकता भासल्यास ) परत रुपये ५०,०००/- शैक्षणिक कर्ज म्हणून (त्याच अटीवर) देण्यास पात्र राहतील. हे अग्रीम ज्या पाल्यांना रु. २५,०००/- अनुदान / स्कॉलरशिप देण्यात आली आहे त्यांनाही देय राहील. या उपक्रमाकरिता वरील अ व ब मधील खर्चासाठी आवश्यकतेप्रमाणे घटक पोलीस कल्याण निधीमध्ये रुपये पाच ते दहा लाख इतकी रक्कम वेगळी ठेवण्यात येईल.

३. वरील पैकी कोणत्याही शिक्षण संस्थेमध्ये देणगी (Donation) देवुन प्रवेश घेतलेल्या पाल्यांना सदरची योजना लागू होणार नाही.

४. ज्या घटकामध्ये घटक पोलीस कल्याण निधीमध्ये निधी अत्यंत कमी आहे, अशा घटक प्रमुखांनी वरील अ व ब मध्ये नमूद खर्चासाठी निधी उपलब्ध करण्यासाठी पाल्यांची नांवे, ते शिक्षण घेत असलेली संस्था व शिक्षण सत्राचा स्तर, प्रत्येकासाठी [illegible] रक्कम इत्यादी माहिती खालील तक्त्यामध्ये नमूद करुन, तसेच घटक [illegible] निधी वृध्दींगत करण्यासाठी घटक प्रमुखांनी केलेले प्रयत्न व त्या [illegible] नमूद करुन या कार्यालयास प्रस्ताव सादर करावेत.:-

Scanned by CamScanner

| अ.क्र. | पाल्याचे नाव | शिक्षण घेतअसलेल्या संस्थेचे / कॉलेजचे नाव | शिक्षणाचा स्तर / वर्ष | वार्षिक फि रुपये |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

५. सदर उपक्रमामागील उद्देश पोलीस पाल्यांमध्ये गुणवत्ता वाढविण्यास प्रोत्साहन देणे, व त्यांना उच्च शिक्षण प्राप्त करुन घेण्याची संधी उपलब्ध करुन देणे हा असून पाल्य सक्षम झाल्यानंतर स्वतःहून आपल्यासारख्या इतर पाल्यांना आवश्यक वेळी मदत करेल, या धोरणावर अवलंबून आहे. यासाठी सदर रक्कम देताना संबंधीत पोलीस पाल्याकडून शिक्षण पूर्ण करुन चांगली नोकरी मिळाल्यानंतर गुणवंत सभासद पाल्यासाठी मदत म्हणुन घटक पोलीस कल्याण निधीमध्येच स्वतंत्र रक्कम म्हणून ठेवण्यात येणा-या रक्कमे मध्ये (या साठी स्वतंत्र खाते उघडण्याची आवश्यकता नाही) स्वयंस्फुर्तीने स्वेच्छेनुसार रक्कम देणगी स्वरुपात देण्यासबंधी स्वेच्छेने हमीपत्र लिहून देण्याबाबत सूचना द्याव्यात. त्यामुळे पोलीस कल्याण निधीमधून मदतीच्या स्वरुपाने अनुदान व बिनव्याजी कर्ज देवून, तसेच वरीलप्रमाणे देणगी घेवून हा उपक्रम सतत कार्यन्वीत ठेवता येईल.

६. या बाबतची तरतूद पोलीस कल्याण निधी नियमावली मध्ये करण्यात येत असून सर्व पोलीस घटक प्रमुखांनी सदर योजना तात्काळ सुरु करावी व ती यशस्वीरित्या चालविण्यात यावी, व त्याबाबतचा प्रगती अहवाल दिनांक ०१/११/२०१६ पर्यंत निश्चितपणे या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. प्रज्ञा सरवदे)
अप्पर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
पोलीस आयुक्त, बृन्हमुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा., मुंबई (सस्नेह)
इतर सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह )
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.



Scanned by CamScanner

an-2019 15:02 DGP OFFICE 02222026566

185.

तातडीचे :-

क्र.पोनस/२८-अे/४९३७/उच्चशिक्षण-प्रो.यो/१३९/(१७)/२०१९

मुंबई, दि. ३० .०१.२०१९

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक दि.२९.०९.२०१६ आणि दि.०१/०२/२०१७ तसेच दि.०१/०२/२०१८ चे परिपत्रक.

विषय :- पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन योजना.

* * * * * *

परिपत्रक

संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने पोलीस कल्याण निधी नियमावली मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीअंतर्गत पोलीस अधिकारी/कर्मचा-यांना (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पर्यंत) तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे याकरिता भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT) तसेच भारतातील कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय, (MBBS) जेथे सामायिक प्रवेश परिक्षेव्दारे प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस रु.१,००,०००/- (रु. एक लाख फक्त) इतकी रक्कम रु.२५,०००/- चा धनादेश व रु.७५,०००/- ची एक वर्षाची मुदत ठेव अशा स्वरुपात देण्यात येतात.

परंतु मुदतठेव (FDR) प्रमाणपत्र तयार करुन देणेसाठी तांत्रिक अडचण येत असल्यामुळे. आता असा निर्णय घेण्यात आला आहे की, रु.१,००,०००/- (रु. एक लाख फक्त) मंजूर अनुदानापैकी रु.५०,०००/- (पन्नास हजार रुपये) इतकी रक्कम प्रथम प्रवेश घेतल्यानंतर धनादेशाव्दारे अदा करावी व उर्वरित रक्कम रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार रुपये) पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतल्यानंतर (व्दितीय वर्षात ) संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना धनादेशाव्दारे अदा करण्यात यावी.

उपरोक्त संदर्भाधीन परिपत्रकातील इतर अटी पुर्वीप्रमाणेच राहतील. तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकातील अटींचे काटेकोरपणे पालन करावे.

ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच सभासद असलेल्या मंत्रालयीन कर्मचा-यांना अनुदानाची / स्कॉलरशिप ची रक्कम अदा करण्यात येईल. त्याबाबतच्या आवश्यक त्या नोंदी त्यांच्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये संबंधीत पोलीस कल्याण निधीचे कामकाज पाहणा-या लिपीक / प्रमुख लिपीकांनी न चुकता घेवून ते पोलीस उपायुक्त / पोलीस उपअधीक्षक ( मुख्यालय ) यांनी प्रमाणित करावीत.

( अनुप कुमार सिंह )
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

75
31/1/2019

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / विशेष कृती / द.वि.प., मुंबई.

Desktop Memo/2017

Scanned by CamScanner

क्रमांक पोमसं/२८-अ/४९३७/उच्चशिक्षण-प्रो.यो/१३९/(१७)/२०१८ मुंबई, दि. ०१.०१.२०१८

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक दि.१९.०९.२०१६ आणि दि.०९/०२/२०१७ चे परिपत्रक.

विषय :- पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन योजना.

* * * * * *

संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने पोलीस कल्याण निधी नियमावली मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीअंतर्गत पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना (पोलीस शिपाई ते पोलीस निरीक्षक पर्यंत) तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून रु.२५,०००/- इतकी रक्कम (स्कॉलरशिप) देणेबावत मंजूरी देण्यात आलेली आहे.

यासंदर्भात आता असा निर्णय घेण्यात आला आहे की, खालील नमूद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस रु.१,००,०००/- (एक लाख फक्त) इतकी रक्कम अनुदान/स्कॉलरशिप म्हणून देण्यात येईल.

१. भारतीय अभियांत्रिकी संस्था (IIT)

२. भारतातील कोणतेही वैद्यकीय महाविद्यालय, (MBBS)

जेथे सामायिक प्रवेश परिक्षेव्दारे प्रथम प्रवेश घेतला आहे.

सदर रु.१,००,०००/- (एक लाख फक्त) अनुदानापैकी रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम धनादेशाव्दारे अदा करावी व उर्वरित रक्कम रु.७५,००००/- (पंच्याहत्तर हजार रुपये) इतक्या रक्कमेची एका वर्षाची मुदत ठेव (FDR) प्रमाणपत्र तयार करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात यावे. तसेच सदरची योजना ही सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून लागू होईल.

या प्रकरणी असे स्पष्ट करण्यात येते की, दि.१९/०९/२०१६ चे परिपत्रकामधील खालील नमूद शिक्षण संस्थामध्ये प्रथम प्रवेश घेतलेल्या प्रत्येक पाल्यांस यापूर्वीच्याच तरतुदीप्रमाणे एकावेळी रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) इतकी रक्कम अनुदान/स्कॉलरशिप म्हणून देय राहील.

१. भारतीय प्रबंध संस्था (IIM)

२. सर्व नॅशनल लॉ स्कूल्स

३. सर्व राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था (NIT)

४. भारतातील कोणतेही डेंटल (BDS) महाविद्यालय,

जेथे सामायिक प्रवेश परिक्षेव्दारे प्रथम प्रवेश घेतला आहे.

याबाबत असे निदर्शनास आले आहे की, या कार्यालयातील परिपत्रकात नमुद अटींनुसार/तरतुदीनुसार अनुदान/स्कॉलरशिप तसेच अग्रिम/ कर्ज वाटपाची कार्यवाही योग्य प्रकारे होत नाही. त्यामध्ये दिलेल्या निर्देशानुसार शैक्षणिक अर्हतेची पडताळणी न करता अनुदानाचे वाटप करण्यात आलेले आहे.

JAN 2018

तरी सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकातील अटींचे काटेकोरपणे पालन करावे.

Desktop/Memo/2017

Scanned by CamScanner

ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच सभासद असलेल्या मंत्रालयीन कर्मचा-यांना अनुदा[illegible] ची रक्कम अदा करण्यात येईल, त्याबाबतच्या आवश्यक त्या नोंदी दोन स्वतंत्र रजिस्टरमध्ये संबंधीत पोलीस [illegible] निधीचे कामकाज पाहणा-या लिपीक / प्रमुख लिपीकांनी न चुकता घेवून ते पोलीस उपायुक्त / पोलीस उपअधी[illegible] ( मुख्यालय ) यांनी प्रमाणित कराव्यात.

11/1/18

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग विशेष कृती / द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह) (बृहन्मुंबई वगळून)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई / न.वि.अ.,नागपूर / फोर्स वन,मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग सहीत)
सर्व समादेशक, रा.रा.पो.बल गट क्र.१ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें रा.रा.पो.प्र.केंद्र, नानवीज-दौंड सह
उप संचालक, डी.टी.एस्., नाशिक.
पोमसं कार्यालयातील विधी सल्लागार /विधी अधिकारी/वउपसहा.(नि.वे.)/आस्थापना-१
पोमसं कार्यालयातील स्वीय सहायक / लघुलेखक.
पोमसं कार्यालयातील सर्व कार्यासन अधिकारी (का.क्र.१ ते ४४)
(त्यांनी उपरोक्त परिपत्रक सर्व लिपिकांच्या निदर्शनास आणून द्यावे.)

प्रत,

पोलीस आयुक्त बृहन्मुंबई (सस्नेह)
प्रभारी अधिकारी

Scanned by CamScanner

नातडीचे :-

क्र.पोमसं/२८-ओ/४९३७/उच्चशिक्षण-प्रो.यो/०२/२०१८

मुंबई, दि. १४.०२.२०१८

विषय :- पोलीस कल्याण निधी सदस्यांच्या मुलीकरिता व्यावसायिक अभ्यासक्रमातील पदव्युत्तर पदविका / पदवी प्रोत्साहनकरिता योजना राबविणेबाबत.

* * * * * *

पोलीस कल्याण निधीच्या, राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांचे मुलींना पदव्युत्तर पदवी शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे या हेतूने विशेष स्कॉलरशिप योजना सुरु करण्यात येत आहे.

या योजनेतंर्गत पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेल्या सभासदांच्या ज्या मुलीने खालील नमूद व्यवसायीक अभ्यासक्रमात पदव्युत्तर पदवी पुर्ण वेळ अभ्यासक्रम पुर्ण केला असेल अश्या मुलीस सदर योजनेतंर्गत अभ्यासक्रमाच्या यशस्वी पुर्तते नंतर रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) ची विशेष स्कॉलरशिप देण्यात येईल.

सदरहू स्कॉलरशिप करिता शासनमान्य शिक्षण संस्थेतून पुर्ण केलेले पुढील अभ्यासक्रम विचारात घेतले जातील.

१. वैद्यकिय M.D., M.S.

२. अभियांत्रिकी M.E., M.Tech., (Master of Technology)

३. विधी अभ्यासक्रम L.L.M.

४. व्यवसाय व्यवस्थापन (M.B.A.,CA/CS/Cost Accountancy (From I.C.W.A), M.C.A )

प्रस्तुत स्कॉलरशिप करिता पोलीस अधिकारी/कर्मचारी तसेच पोलीस कल्याण निधीचे सभासद असलेले लिपीक वर्गीय अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या मुलीच्या पदव्युत्तर पदवीच्या अंतिम वर्षाची मार्कशिट जोडून संबंधीत घटक प्रमुखांकडे अर्ज सादर करावा.

सदरची योजना सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षापासून लागू असेल व तिच्या अंमलबजावणीची माहिती पोलीस घटक प्रमुख वेळोवेळी या कार्यालयास कळवतील.

( सतीश माथुर )
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)

अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / विशेष कृती / द.वि.प., मुंबई.

-: २ :-

पोलीस अधीक्षक कार्यालय उस्मानाबाद

| | |
|---|---|
| पो.अ. | |
| अपर पो.अ. | |
| पो.उप अ.(मु.) | |
| का.अ. | |
| प्र.लि. | |
| शाखा | C.B.III |
| आवक | 2946 |

Desktop/Memo/2017

(13)

<u>तातडीचे</u>

क्र.पोमसं/२८-अ/४९३७/वा.शै.अनुदान/पोशि ते सपोउनि/९२/२०१७, मुंबई,दिनांक १८.५.२०१७

**विषय :-** पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून माध्यमिक ते उच्चमाध्यमिक ( इ ५ वी ते १० वी ) पर्यंतच्या शिक्षणासाठी वार्षिक शैक्षणिक अनुदान मंजूर करण्याबावत.

** ** ** *

<u>परिपत्रक</u>

राज्य पोलीस दलातील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलींना शालेय शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे या हेतूने पोलीसांच्या <u>मुलींसाठी शैक्षणिक प्रोत्साहन योजना</u> राबविण्याचे निश्चित केलेले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व पोलीस घटकांतील पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक ( PCs to ASIs) दर्जाच्या पोलीस कर्मचा-यांच्या इ ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेत असलेल्या २ मुलींना वार्षिक शैक्षणिक अनुदान पोलीस कल्याण निधीतून देण्याबाबत पोलीस महासंचालक यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार, सर्व घटक प्रमुखांना सूचीत करण्यात येते की, २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून इयता ५ वी ते १० वी पर्यंतचे शिक्षण घेत असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलींना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी ५००/- रुपये वार्षिक, या दराने शैक्षणिक प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे. सदरचे अनुदान हे वरील दर्जाच्या पोलीस कर्मचाऱ्याच्या २ मुलींना मर्यादित असेल तसेच, त्यासाठीचे अर्ज, मुलींचे शिक्षण घेत असल्याबाबत शाळेच्या प्रमाणपत्राच्या प्रतीसह प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या ३१ऑगस्ट पर्यंत सादर करणे आवश्यक राहील, प्रत्येक वर्षी मंजूर करण्यात येणा-या वार्षिक शैक्षणिक अनुदानाची स्वतंत्रपणे नोंदवही ठेवण्यात येईल. घटक प्रमुखांनी त्याप्रमाणे कार्यवाही करुन प्रत्येक आर्थिक वर्षात देण्यात आलेल्या शैक्षणिक अनुदानाची माहिती आर्थिक वर्षानंतर प्रत्येक वर्षाच्या ३० एप्रिल पर्यंत या कार्यालयास कळवावी.

18/5/17

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

प्रत,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह ) (बहन्मुंबई वगळून)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि, म.रा.,पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, म.रा., पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक (रेल्वे/मोटार परिवहन/बिनतारी संदेशासह).
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १ ते १६.
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये.
उप संचालक, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
कार्यासन अधिकारी, का.क्र. ३६ (अभिलेखी परिक्षेत्र, ा्साठी)

CB 14557
2 MAY 2017

प्रत,

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली कॅम्प नागपूर.

प्रत, माहितीस्तव

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)

261/3015

878D:/ADMIN/Desktop/28-A/Memo.doc

Scanned by CamScanner

तातडीचे :-

क्र.पोमसं/२८-अे/४९३७/वा.शै.अनुदान/वर्ग-ड ते वश्रेलि/९२/२०१७ मुंबई, दि.27/10/२०१७.

संदर्भ :- या कार्यालयाचे समक्रमांक दि.१८.०५.२०१७ चे परिपत्रक.

विषय :- **पोलीस कर्मचा-यांच्या (वरिष्ठ श्रेणी लिपीक ते कनिष्ठ श्रेणी लिपीक तसेच वर्ग-ड चे कर्मचारी.) मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून माध्यमिक ते उच्चमाध्यमिक ( इ ५ वी ते १० वी ) पर्यतच्या शिक्षणासाठी वार्षिक शैक्षणिक अनुदान मंजूर करण्याबाबत.**

* * * * * *

संदर्भाधीन परिपत्रकाच्या अनुषंगाने पोलीस कल्याण निधी नियमावली मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र पोलीस कल्याण निधीतंर्गत पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक (ASI) या दर्जाच्या पोलीस कर्मचा-यांच्या मुलींना शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून माध्यमिक ते उच्चमाध्यमिक ( इ ५ वी ते १० वी ) पर्यतच्या शिक्षणासाठी वार्षिक शैक्षणिक अनुदान त्यांना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी रु.५००/- (अक्षरी रक्कम रुपये :- पाचशे फक्त) एकरकमी अनुदान म्हणुन देण्याबाबत घटक कार्यालयांनी कार्यवाही चालु केलेली आहे.

त्याअनुषंगाने सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते की, वर्ग-ड तसेच कनिष्ठ श्रेणी लिपीक ते वरिष्ठ श्रेणी लिपीक (कमाल मर्यादा ग्रेड पे रु.२४००/- पर्यत ) चे कर्मचारी जे पोलीस कल्याण निधीचे सदस्य आहेत त्यांच्या २ मुलींना घटक पोलीस कल्याण निधीतून प्रत्येकी ५००/- रुपये वार्षिक इतके शैक्षणिक प्रोत्साहन अनुदान देण्यात यावे.

**या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, या कार्यालयाचे दि.१८.०५.२०१७ च्या परिपत्रकान्वये हे अनुदान मंजूर करताना कर्मचा-यांच्या मुली शिक्षण घेत असल्याबाबत शाळेच्या प्रमाणपत्राची अट निश्चित केली होती. सदरची अट ही रद्द करण्यात येत आहे. कर्मचा-यांनी शैक्षणिक अनुदानासाठी लेखी स्वाक्षरीत अर्ज केल्यावर तो लेखी स्वाक्षरीतला अर्ज हेच स्वसांक्षाकित प्रमाणपत्र समजून अर्जदारांना तात्काळ रक्कम मंजूर व अदा करावी. अर्जदारांकडे इतर कोणत्याही प्रकारच्या कागदपत्राची मागणी करु नये. तसेच सदरची रक्कम कर्मचा-यांच्या थेट बँक खात्यात जमा करावी.**

पोलीस कल्याण निधींचे कामकाज पाहणा-या लिपीकांने ज्या पोलीस कर्मचा-यांना तसेच मंत्रालयीन कर्मचा-यांना वार्षिक शैक्षणिक अनुदानाची रक्कम अदा करतील, त्याबाबतच्या आवश्यक त्या नोंदी ठेवून, अभिलेख अद्ययावत ठेवावे.

CB-3 / Welfare Clerk

( डॉ. प्रज्ञा सरवदे )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचे करिता.

पोलीस अधीक्षक कार्यालय उस्मानाबाद
पो.अ.
अपर पो.अ.
उ.वि.पो.अ.(मु.)
...
लि.
शाखा C-13
क्रमांक 29366
1 OCT 2017

प्रति,

महासंचालक, अँटी करप्शन ब्युरो, म.रा., मुंबई (सस्नेह अग्रेषित)
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा.,पुणे / प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल / वाहतूक / लोहमार्ग / विशेष कृती / द.वि.प., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे.

C:/Desktop/Memo/2017

849/2017

Scanned by CamScanner